# नाशिक महानगरपालिका, नाशिक

राजीव गांधी भवन, शरणपुर रोड, (पोस्ट बॉक्स नं. १२) नाशिक -४२२००२

Visit us at : www.nmv.gov.in • E-mail :- commissionernmc@gmail.com


जा.क्र.मनपा/साबांवि/डेस्क-८/93 / २०२५

दिनांक :- 20/ ०३/ २०२५

## कार्यारंभ आदेश

**प्रति**

**मे.एच.सी.पी.डिझाईन प्लानिंग ॲन्ड मॅनेजमेंट,**

**अहमदाबाद**

**विषय-** **गोदावरी नदी काठचा मास्टर प्लॅन आणि राम-काल पथ प्रकल्पाचा सविस्तर आराखडा तयार करणे.**

**संदर्भ :-** दि. २० /०३ /२०२५ रोजी आपण करून दिलेला करारनामा

| मक्तेदाराचे व्हेंडर नंबर | प्राकलन/ वर्क ईआरपी नंबर | निविदा ईआरपी नंबर |
|---|---|---|
| | १८२००१५२४० | |
| प्रशासकीय ठराव / आदेश क्र.६११ दि.०८/०१ /२०२५ | ई निविदा सुचना क्र.१७ दि. २८/०१ /२०२५ | मा.स्थायी समिती ठराव क्र.३४७ दि.११/०२/२०२५ |
| करारनामा पत्र क्र.-१९६ दि.१२/०२/२०२५ | अतिरिक्त सुरक्षा अनामत ---- | सुरक्षा अनामत र.रु. २५,१२,५००/- |
| तरतुद | सिंहस्थ कामे- मनपा अंतर्गत कामे | संगणक कोड क्र. २९४५ |

वरील विषय व संदर्भान्वये आपणांस कळविणेत येते की, सदर काम प्राकलन दराने होणा-या र.रु.१०,०५,००,०००/- (अक्षरी र.रू. दहा कोटी पाच लक्ष मात्र ) इतक्या रक्कमेपर्यंत करणेस मंजुरी मिळालेली आहे. आपण सदरचे काम मुदतीत करारनाम्याच्या अटीशर्ती नुसार पूर्ण दि20/०३/२०२५ ते दि 9e/०३ /२०२८ पावेतो करण्यासाठी खालील अटी शर्तीस अधिन कार्यारंभ आदेश देण्यात येत आहे.

१. सदर कामाची मुदत ही कार्यारंभ आदेशाच्या दिनांकापासून ३६ ( छत्तीस महिने) एवढी राहील. सदर मुदत पावसाळा हंगाम धरून असुन कामाची प्रगती निविदेतील अटी शर्ती क्र.२ प्रमाणे सातत्याने ठेवायची आहे.

२. कामाच्या ठिकाणी आपण नेमलेल्या प्रतिनिधीचे नाव, पत्ता, भ्रमणध्वनी क्रमांक या कार्यालयास तसेच उपअभियंता यांना ७ दिवसाचे आत लेखी स्वरूपात कळविण्यात यावेत.आपल्या प्रतिनिधीस उपअभियंता / शाखा अभियंता / क. अभियंता यांनी कामासंबंधी दिलेल्या सुचना बंधनकारक राहतील .

३. मा. आयुक्त सो. यांचा आदेश क्र. ४५२ दिनांक ०६/०७/२०१५ अन्वये मनपा Pms मोबाईल ॲपव्दारे Know Our Works या सदराखाली काम सुरु करण्यापुर्वी काम सुरु असतांना व काम पुर्ण झाल्याचे छायाचित्र व चलचित्र (व्हिडीओ) रेकॉर्डीग करुन वेळोवेळी अपलोड करणे तसेच प्रत्येक कामाचे छायाचित्र काढणे व ते देयकाबरोबर सादर करणे मक्तेदारास बंधनकारक आहे.

४. कार्यारंभ आदेश मिळालेनंतर आपण करावयाच्या कामाचा प्रत्येक महिन्याचा आराखडा तयार करून ७ दिवसाचे आत या कार्यालयास व उप अभियंता, यांना कळविणेत यावा. तसेच कामाची गुणवत्ता राखुन ठरवुन दिलेल्या कालावधीमध्ये पुर्ण करणेची जबाबदारी आपली आहे.

५. कामासाठी गौण खनिजातील स्वामित्वधन शासनास भरणे आवश्यक आहे. त्यासाठी योग्य त्या प्राधिकरणाकडे स्वामीत्वधन भरणेत येऊन त्यांचे ना हरकत प्रमाणपत्र देयकासोबत सादर करणे बंधनकारक राहील. अन्यथा देयकातून वसुली करणेत येईल, याची नोंद घ्यावी.

पुढील पानावर-२.

६. निविदा शर्तीनुसार कामाचा विमा व कामगारांचा विमा काढणे आवश्यक आहे. सदरचा विमा संचालक, विमा निधी महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडुनच काढण्यात यावा व त्याची प्रत या कार्यालयास १५ पंधरा दिवसाचे आत सादर करण्यात यावी अन्यथा निविदा अटी शर्तीनुसार कार्यारंभ आदेशात नमुद कामाच्या किंमतीच्या १ % दराने त्याची वसुली आपल्या देयकातुन करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

७. भविष्य निर्वाह निधी कायदा १९५२ व दिनांक ०८/०१/२०११ ची अधिसुचना अन्वये मक्तेदाराने कामावर नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांचा भविष्य निर्वाह निधी भरलेबाबतची चलने बिलासोबत सादर करावी. मक्तेदाराने शासन निर्णयाप्रमाणे करासंबधित जी.एस.टी.चे रजिस्ट्रेशन करुन जी.एस.टी. कर भरणे बंधनकारक आहे. तसेच दिनांक ०१/०७/२०१७ पासुन जी.एस.टी. कर प्रणाली लागु झाल्यामुळे सदर कामामध्ये वस्तू व सेवा यांची यादी वा विक्री केले बाबतचे विवरणपत्र दरमहा पाच तारखेच्या आत मनपास सादर करणे बंधनकारक आहे.

८. मक्तेदाराने कामावर नियुक्त कर्मचाऱ्यांना अधिनियम १९४८ दिनांक २४/०२/२०१५ अन्वये देय असलेला किमान वेतन अदा केलेबाबतचे हमीपत्र मक्तेदाराने त्यांचे / कंपनीचे लेटर हेडवर बिलासोबत सादर करणे बंधनकारक आहे.

९. देयक अदा करतांना निधीच्या उपलब्धतेनुसार अदा करणेत येईल. देयक अदा करणेसाठी विलंब झाल्यास त्याबाबत कुठलाही क्लेम देण्यात येणार नाही.

१०. काम करतांना सुरक्षे चे दृष्टीने आवश्यक उपाय योजना जसे Precautionery,साईन बोर्ड,सिक्युरीटी बॅन्ड,बॅरीकेटींग चा वापर करावा जेणे करून अपघात होणार नाही याची दक्षता घ्यावी ,त्याचप्रमाणे काम करताना कामगारांसाठी (सिवरमेन)सेप्टी हेल्मेट, सेप्टी बेल्ट, हॅन्डग्लोव्हज ,गमबूट,गॅस मास्क , कृत्रिम श्वसन किट इ.साहित्यृा पुरवून त्याचा वापर करावा.

११. काम करतांना युटीलीटी सर्विसेस (विदयुत केबल,पाणीची पाईप लाईन,ड्रेनेज लाईन) इत्यादी नादुरुस्त झाल्यास मक्तेदाराने स्वखर्चाने व वेळेत दुरुस्त करण्यात याव्यात.

**शहर अभियंता**
नाशिक महानगरपालिका, नाशिक

**प्रत कार्यवाहीसाठी**

१) गुण नियंत्रण व दक्षता विभाग, मनपा, नाशिक

२) विमा संचालक, महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण भवन, (म्हाडा)
पहीला मजला, कलानगर समोर, रुम नं. २६४ बांद्रा (पुर्व), मुंबई ४०० ०५१

३) उपअभियंता, साबांवि , मनपा, नाशिक

अ) विषयांकीत कामाचा प्रगती अहवाल प्रत्येक १५ दिवसांनी सादर करावा.

ब) प्रशासकीय/सर्वसाधारण मान्यतेपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची दक्षता घेऊन मंजूर रक्कमेच्या मर्यादेत खर्च समित करणेबाबत सर्वस्वी जबाबदारी आपली राहील. कामाचे ठिकाणी कामाचे माहितीदर्शक फलक लावून कामाची प्रत्यक्ष लाईन आऊटदेण्यात यावी.

क) कार्यारंभ आदेशामध्ये नमुद केलेप्रमाणे सर्व अटी / शर्तीनुसार पुर्तता करुन घेणेत यावी.

४) स्थळप्रत.